# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## मराठी विभाग

पुढारी | पुणे बुधवार ८ ऑगस्ट २०१८

### प्रकाशन व्यवसायातही करिअरच्या संधी

**▪ बाळासाहेब घोंगडे यांचे मत ▪ कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन**

राजगुरुनगर : प्रतिनिधी

आजच्या घडीला मराठी व इतर भाषांमध्येही विपुल प्रमाणात पुस्तकांचे प्रकाशन होत असून, विद्यार्थ्यांमध्ये जिद्द व चिकाटी असेल तर प्रकाशन व्यवसायातही करिअरच्या खूप संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन पुण्याच्या 'अक्षर वाङ्मय'चे प्रकाशक बाळासाहेब घोंगडे यांनी येथे केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी 'प्रकाशन व्यवसायातील संधी' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. साईनाथ पाचारणे आदी उपस्थित होते.



गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मान्यवर.

घोंगडे म्हणाले की, एखादे हस्तलिखित प्रकाशकाकडे आल्यानंतर त्यावर टंकलेखन, मुद्रितशोधन, सजावट, मुखपृष्ठकार, छपाई, बाइंडिंग, फोल्डिंग, शिलाई असे अनेक संस्कार होतात; मगच ते पुस्तक विक्रेत्यांकडे जात असते. संपादकासह पुस्तकाला संबंधित अनेकांचा स्पर्श होत असतो आणि या सर्व स्तरावर कौशल्याधारित मनुष्यबळाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांनी प्रकाशन व्यवसायात येण्यासाठी संबंधित कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःला ओळखून निवडलेल्या क्षेत्रात उत्तम व प्रतिभावंत होण्याचे आवाहन केले.

मराठी विभागातील वृषाली शितोळे, सपना थोरात, सुनील वायकर, धनंजय रौंधळ, पायल नेटके, प्रतीक्षा कराळे, विकास शिंदे या विद्यार्थ्यांचा सत्कार आणि पदवीच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

**उलगडली 'फेसाटी'ची यशोगाथा**

वाचन संस्कृती रुजविणे तसेच साहित्यनिर्मिती करणे या उद्देशाने मी प्रकाशन व्यवसायात आलो, असे यांनी सांगून बाळासाहेब घोंगडे यांनी अक्षर वाङ्मयतर्फे प्रकाशित केलेल्या आणि २०१८ सालच्या युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त नवनाथ गोरे लिखित 'फेसाटी' कादंबरीची यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडली.

---

केसरी | पुणे, ९ ऑगस्ट २०१८

### प्रकाशन व्यवसायातही करिअरच्या खूप संधी उपलब्ध

**बाळासाहेब घोंगडे यांचे प्रतिपादन**

राजगुरुनगर, (वार्ताहर) : आजच्या घडीला मराठी व इतर भाषांमध्येही विपूल प्रमाणात पुस्तकांचे प्रकाशन होत असून विद्यार्थ्यांमध्ये जिद्द व चिकाटी असेल तर प्रकाशन व्यवसायातही करिअरच्या खूप संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या अक्षरवाङ्मय प्रकाशनाचे प्रकाशक बाळासाहेब घोंगडे यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी प्रकाशन व्यवसायातील संधी या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ.संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा.साईनाथ पाचारणे, प्रा. राऊत आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विषय विशेष स्तरावर अभ्यासणारे विद्यार्थी उपस्थित होते.

बाळासाहेब घोंगडे पुढे म्हणाले की, एखादे हस्तलिखित प्रकाशकाकडे आल्यावर त्यावर टंकलेखन, मुद्रितशोधन, सजावट, मुखपृष्ठकार, छपाई, बायडिंग, फोल्डिंग, शिलाई असे अनेक संस्कार होऊन मग ते पुस्तक विक्रेत्याकडे जात असते. संपादकासह संबंधित पुस्तकाला अनेकांचा स्पर्श होत असतो. या सर्व स्तरावर कौशल्याधारित मनुष्यबळाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांनी प्रकाशन व्यवसायात येण्यासाठी संबंधित कौशल्य आत्मसात करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. वाचनसंस्कृती रुजविणे तसेच साहित्य निर्मिती करणे या उद्देशाने मी प्रकाशन व्यवसायात आलो असल्याचे त्यांनी सांगितले. अक्षरवाङ्मयतर्फे प्रकाशित झालेली २०१८ चा युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त नवनाथ गोरे लिखित 'फेसाटी' कादंबरीची यशोगाथा यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर कथन केली. प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःला ओळखून निवडलेल्या क्षेत्रात उत्तम व प्रतिभावंत होण्याचे आवाहन केले.



मराठी विभागातील वृषाली शितोळे, सपना थोरात, सुनील वायकर, धनंजय रौंधळ, पायल नेटके, प्रतीक्षा कराळे, विकास शिंदे या गुणवंत व विविध उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पदवीच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ.संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार विद्यार्थीनी कु. पायल नेटके हिने मानले.

सकाळ
गुरुवार, ९ ऑगस्ट २०१८ | ५

# प्रकाशन व्यवसायातही करिअरच्या संधी : घोंगडे

**राजगुरुनगर :** "प्रकाशन व्यवसायात कौशल्याधारित मनुष्यबळाची आवश्यकता असून, करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत." पुण्याच्या अक्षरवाङ्मय प्रकाशनाचे प्रकाशक बाळासाहेब घोंगडे यांनी सांगितले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी 'प्रकाशन व्यवसायातील संधी' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. साईनाथ पाचारणे आदी उपस्थित होते. घोंगडे पुढे म्हणाले की, "आजच्या घडीला मराठीसह सर्व भाषांमध्ये विपुल प्रमाणात पुस्तकांचे प्रकाशन होत आहे. एखादे हस्तलिखित प्रकाशकाकडे आल्यावर त्यावर टंकलेखन, मुद्रितशोधन, सजावट, मुखपृष्ठकार, छपाई, बायडिंग, फोल्डिंग, शिलाई असे अनेक संस्कार होऊन मग ते पुस्तक विक्रेत्याकडे जात असते. या सर्व स्तरांवर मनुष्यबळाची गरज असल्याने विद्यार्थ्यांनी प्रकाशन व्यवसायात येण्यासाठी संबंधित कौशल्य आत्मसात करावे." मराठी विभागातील वृक्षाली शितोळे, सपना थोरात, सुनील वायकर, धनंजय रौंधळ, प्रतीक्षा कराळे, विकास शिंदे या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार पायल नेटके हिने मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख